IJCRT.ORG ISSN : 2320-2882

INTERNATIONAL JOURNAL OF CREATIVE RESEARCH THOUGHTS (IJCRT)

An International Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# स्वराज्यातील शिवपूर्वकालीन आणि शिवकालीन कृषी व्यवस्था

**अमितकुमार गणेश शिंगणे**
संशोधक विद्यार्थी
एम. इ. एस. कॉलेज मेहकर,
जिल्हा बुलढाणा.

**प्रस्तावना -**

तेराव्या शतकात प्रथमत: महाराष्ट्र इस्लामी सत्तेखाली आला. दिल्लीतील अल्लाउद्दीन खिलजी नंतर मोहंमद बिन तुघलक यांनी दख्खनचे काही भाग हस्तगत केले. मोहंमद बिन तुघलक याने दिल्लीहून दौलताबाद येथे आपली राजधानी स्थलांतरित केली. बहमनी सुल्तानांनी येथे सुमारे 150 वर्षे राज्य केले. सोळाव्या शतकाच्या सुरुवातीपर्यंत मुघल साम्राज्यांशी संलग्न असलेल्या अनेक इस्लामी राजवटींनी मध्य महाराष्ट्र व्यापलेला होता तर किनारपट्टीवर मसाल्याच्या पदार्थांच्या व्यापाराच्या हेतूने आलेल्या पोर्तुगीजांचा अंमल होता. शिवपूर्वकाळात महाराष्ट्रावर मुस्लिम सत्तेपूर्वी यादवांची सत्ता होती ती नष्ट झाल्यानंतर मुस्लिम सत्ताधीश झाले. बहामनी पातशाही इ.स. 1347 मध्ये सुरू झाली. त्यांनतर मुघलांनी जवळजवळ संपूर्ण भारतात अंमल सुरू झाला. शिवाजी महाराजांनी महाराष्ट्रात मुस्लिम सत्तेशी सामना करून स्वराज्य निर्माण केले. जिथे जनतेला स्वाभिमानाने, भयमुक्त होऊन जगता येईल.

स्वराज्यातील शिवपूर्वकालीन आणि शिवकालीन आर्थिक जीवन हे शेतीशी सलग्न होते. तत्कालीन महसुलाचा प्रमुख स्त्रोत कृषीपासून येणारा कर असून संपूर्ण व्यापार कृषीशी सलग्न होता. स्वराज्यामध्ये शिवपूर्वकाळात शेती हा प्रमुख व्यवसाय असून देखील शेती आणि शेतकऱ्यांना कुठल्याही प्रकारचे संरक्षण नव्हते. दुष्काळ, नपिकी अशा परिस्थितीत शेतकरी हिताचा विचार होत नव्हता अथवा कृषी सुधारणेसाठी विशेष असे प्रयत्न केल्या जात नव्हते. परंतु शिवाजी महाराजांनी **'हिंदवी स्वराज्य'** स्थापन केल्यानंतर शेतकऱ्यासाठी शेतीविषयक नियमावली तयार केली. शेतीमध्ये सुधारणा करण्यात आल्या, अस्मानी सुलतानी संकट प्रसंगी संरक्षण मिळून कृषी व्यवस्थेत परिवर्तन घडून आणले; ज्यामुळे शिवाजी महाराजांना मध्ययुगीन भारतातील **"नव्या कृषी रचनेचे जनक"** म्हटल्या जाते. शिवाजी महाराजांनी शेतकऱ्यांसाठी महाराष्ट्रामध्ये नव्या कृषी रचनेची संस्कृती निर्माण केली ज्याची आपल्याला आजही अनुभूती येते.

**शिवपूर्वकालीन स्वराज्यातील (महाराष्ट्र) कृषी व्यवस्था -**

शिवपूर्वकालीन उत्तर भारतात म्हणजेच महाराष्ट्रात मोगल सत्ता होती आणि दक्षिणेत कुतुबुशाही, आदिलशाही, बरीदशाही, इमादशाही या शाह्यांनी महाराष्ट्राला व्यापले होते. पश्चिम किनारपट्टीवरील गोव्यात आणि वसईत पोर्तुगिजांनी अगोदरच आपले साम्राज्य स्थापन केले होते; तर इंग्रच, डच, फ्रेंच, यांनी व्यापारी कंपन्याच्या माध्यमांतून वखारींच्या रूपात येथे चंचु प्रवेश केला होता. अहमदनगरच्या निजामशाही आणि विजापूरचा आदिलशाहा या दोन सुलतानांनी बराचसा प्रदेश आपआपसात वाटून घेतला होता. ते मनाने उदार नसल्याने प्रजेवर अन्याय करीत. या दोघांचे एकमेकांशी हाडवैर असल्याने त्यांच्यात नेहमी लढाया होत. रयतेला पोटभर अन्न नव्हते. राहायला सुरक्षित निवाराही नव्हता. सगळीकडे अन्याय - अत्याचार माजला होता. ज्यामध्ये रयतेचे हाल होऊन रयत दुःखात जीवन जगत होती. महाराष्ट्रात ठिकठिकाणी देशमुख, देशपांडे इत्यादी वतनदार होते, रयतेकडे त्यांचे लक्ष नव्हते. फक्त वतनासाठी ते एकमेकांशी आपापसात लढत खरतर रयतेचे हाल होत सगळीकडे अंदाधुदी माजली होती. तत्कालीन मुस्लिम सत्ताधीशांचा हेतू फक्त राज्यकारभार सांभाळणे, राज्य चालवायचे हा होता. संबधित प्रदेशाचा विकास करणे, गावे वसाहती स्थापन करणे, शेतीस प्राधान्य देवून शेतकऱ्यास उत्तेजन देणे हा कधी नव्हताच. त्यामुळे मुस्लिम राजवटीच्या काळात जमिनीची मालकी पाटलाची असल्याने त्यात राजसत्ता ढवळाढवळ करीत नव्हती. शेतकऱ्यांचे चांगले - वाईट, शेतीतील प्रगती, शेतकऱ्याचे हित ह्या गोष्टीकडे राजसत्ता क्वचितच पाहत. इतकेच नव्हे तर क्रमाक्रमाने जमिनीचा सारा वाढविण्याची पद्धती देखील निजामशाहीत होती. शेतीवरील कर हे शासनाच्या उत्पन्नाचे प्रमुख साधन होते तरी हा कर उत्पादनाच्या प्रभागातच वसुल केला जात होता. जमिनीची मोजणी करण्याचे धोरण निरनिराळ्या सत्ताधिशांनी स्विकारलेले होते. परंतु ते शेतकरी हिताचे नसून जास्तीत जास्त महसूल मिळावा या उद्देशाचे होते.

मध्ययुगीन काळात शेतीविषयक अर्थव्यवस्थेला विशेष महत्त्व होते. समाजाचे जिवन व साम्राज्याची आर्थिक स्थिती व्यवसायावर अवलंबून असल्याने शेतीच्या विकासाच्या दृष्टीने, आवश्यक ती सर्व काळजी मध्ययुगीन काळात घेतली जात होती. त्यामुळेच या काळातील जमिनविषयक अर्थव्यवस्था, शेतातील उत्पादनाला गती मिळालेली दिसुन येते. या काळातील सम्राटांनी शेतीविषयक सुधारणाकडे विशेषत्वाने लक्ष दिलेले होते. शेतीच्या विकासांमुळेच या काळातील निरनिराळ्या साम्राज्यानांही आर्थिक संपन्नता प्राप्त करणे शक्य झाले. शेतीच्या उत्तम उत्पादनासाठी नदीच्या प्रवाहातून कालवे काढले जात असत. बागलाणच्या प्रदेशातून अशाप्रकारे काढलेल्या पाटामधून शेतीला पाणीपुरवठा केला जात असल्याची माहीती मिळते. यमुना नदीला कालवा काढण्याचे शहाजहानने सुरू केलेले कार्य महंमद शहाच्या कारकीर्दीत पूर्ण झाल्याची माहीती मिळते. पंजाब, लाहोर, सिंध या भागातही कालव्यांव्दारे शेतीला मोठ्या प्रमाणावर पाणीपुरवठा केला जात असे. वयक्तीक स्तरावर शेतीला पाणीपुरवठा करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांना शासनाच्या वतीने सहकार्य दिले जात होते. यावरून मध्ययुगीन काळातील सत्ताधिशांनी शेतीला पाणीपुरवठा करण्यासाठी निरनिराळ्या योजना केल्या होत्या असे दिसून येते. पाणीपुरवठ्यामुळे शेतीतून मोठ्या प्रमाणावर पिके काढली जाऊ शकतात तसेच नविन जमिनही लागवडी येते. म्हणून शासनातर्फे या काळात सहकार्य दिले जात होते असे दिसते.

सुलतानशाहीच्या काळापासून मराठा काळापर्यंत विभिन्न सत्ताधिशांच्या कारकिर्दीत महसुलांच्या पद्धती वेगवेगळया होत्या. सामान्यतः हा महसूल शेतीतील एकूण उत्पादनाच्या जास्तच घेतला जात. महसुलाच्या प्रमाणामुळे शेतकऱ्यांची उत्पादन करण्याची प्रवृत्ती नष्ट होणार नाही याची काळजी घेण्यात येत असे. सामान्यतः शेतातील हा कर धान्याच्या स्वरुपात किंवा रोख रक्कमेच्या स्वरुपात वसूल केला जाई. धान्याचे उत्पादन घेण्याच्या वेळी महसूल वसूल करण्याची पध्दत होती. जास्तीत जास्त महसूल मिळविणे हाच तत्कालीन राज्यकर्त्यांचा हेतू असल्याने शेतकरी यामध्ये अडकत असे त्याला कुठल्याही प्रकारचे संरक्षण नव्हते. ज्यामुळे शेतकरी कष्टमय जीवन जगत असलेला दिसून येतो.

**शिवकालीन स्वराज्यातील कृषी व्यवस्था -**

शिवकाळात जमिनीला मातेचा दर्जा दिला ज्यामुळे जमिनीला भूमाता म्हणत. शेतकऱ्यांनी शेती केल्यावर जमीन उपजाऊ होत असे. शेतकरी हा समाजाचा उत्पादक घटक असे. तत्कालीन कागदपत्रात शेतकऱ्यांचा उल्लेख कुणबी, मुजारी, रय व रयत असा केलेला आढळतो. महाराष्ट्रातील प्रदेशावर परिपूर्ण ताबा मिळाल्यानंतर शिवाजी महाराजांनी प्रशासकीय सोयीसाठी या प्रदेशाचे तीन विभाग केले. हे विभाग पेशवे मोरोपंत पिंगळे, अण्णाजी दत्तो आणि दादाजीपंत वाकनीस यांचे देखरेखीखाली ठेवले. पेशव्यांकडे कल्याण, भिवंडी ते वारघाट आणि कोकण असा प्रदेश होता. अण्णाजी दत्तोकडे दाभोळ, राजापूर, कुडाळ व बांदे धरून चौल ते कोपल असा भाग होता. वाईपासून तुंगभद्रा नदीपर्यंतचा प्रदेश दत्ताजीपंत वाकनीसांच्या देखरेखीखाली होता. अण्णाजी दत्तोंच्या एका पत्रात जमिनीच्या तेरा प्रकारांचा उल्लेख केलेला आढळतो. एका यादीत भात पिकणाऱ्या जमिनीचे वर्गीकरण अवल, दुम, सीम, चारहम, बाविल, खारवट, रहू, खारी, कदायत व तुरवट इतक्या प्रकारे केले आहे. परंतु सामान्य व्यवहारांत मात्र हे वर्गीकरण अवल, दुम, सीम व कधीकधी चारहम असेच असे. शिवाजी महाराजांच्या ताब्यात जो मुलूख आला त्यातील गावे वसाहतीस आणून त्यात शेतीची व्यवस्था करणे हे एक मुख्य काम होते. ह्या कामाची मुख्य अंगे तीन होती. 1. नापिकी जमीन पिकाऊ करणे, 2. पिकांसोबतच गावकरी आणि शेतकरी ह्यांचे रक्षण करणे, 3. राज्यांतील सर्व जमिनीचे मोजमाप करून सारा आकारणी करणे. ह्या तिन्ही गोष्टीस त्यावेळी लावणी, संचणी, उगवणी आणि चकबंदी, टकबंदी, जमाबंदी ही नावे होती. सामान्यतः प्रत्येक वर्षी जमीनझाडा पाहून त्या त्या गावाचे पाहणीपत्रक तयार करीत. त्यात जमिनीवरील सरकारी दस्त दरवर्षी ठरत असे.

शिवकाळात स्वराज्याचा आधार म्हणजे प्रत्यक्ष शेतात राबणारी रयत होय. शेतात राबणाऱ्या शेतकऱ्यांचे उत्पन्न हेच स्वराज्याचे उत्पन्न होते तसेच शेतकऱ्यांच्या कुटुंबातील युवा तरुण स्वराज्य सेवेसाठी सैन्यात दाखल होत असल्याने स्वराज्य रक्षणासाठी सैन्य मिळत असे. या सर्व बाजूचा विचार करताना शिवाजी महाराजांनी आपल्या स्वराज्यातील शेतकरी हिताचा विचार करून शेतकऱ्यांच्या उन्नतीच्या योजना राबविल्या, शेतकऱ्यांना अनेक सवलतीही दिल्या. स्वराज्य स्थापनेच्या रणसंग्रामात त्यांनी शेतकऱ्यांची कधीही हेळसांड होऊ दिली नाही. शेतकऱ्यांना वाऱ्यांवर सोडून त्यांनी लढाया केल्या नाहीत. 23 ऑक्टोबर 1662 रोजी सर्जेराव जेधे यांना पाठविलेल्या पत्रात शिवाजी महाराज म्हणतात, "तुमच्या इलाख्यात मोगलांची फौज (शाहिस्तेखान) येत असल्याची बातमी हेरांनी दिली आहे. त्यामुळे इलाख्यातील सर्व रयतेला लेकरा-बाळांसह घाटाखाली सुरक्षित जागा असेल तेथे पाठवणे. या कामात हयगय करू नका. या कामात हयगय कराल, तर तुमच्या माथी रयतेचे पाप बसेल. गावोगावी हिंडून सेतपोत जतन करणाऱ्यांचे हित जोपासावे. या कामात दक्षता बाळगावी." परचक्रापासून शेती अणि शेतकरी वाचला पाहिजे, याबाबत शिवाजी महाराजांनी घेतलेली काळजी आजदेखील पथदर्शक आहे.

शेतकऱ्यांच्या हिताला त्यांनी नेहमीच प्राधान्य दिले. शिवाजी महाराजांनी 19 मे 1673 रोजी चिपळूण (हलकर्ण) येथील जुमलेदार, हवालदार आणि कारकुनांना पाठवलेल्या पत्रात शेतकऱ्यांशी कसे वागावे, याचे नीतिशास्त्रच सांगितलेले आहे. "जनावरांचा चारा काटकसरीने वापरा. चाऱ्यांची उधळपट्टी कराल तर पावसाळ्यात जनावरांना उपास पडेल, घोडी मरायला लागतील. मग तुम्ही कुणब्याकडून (शेतकऱ्यांकडून) धान्य, भाकरी, गवत, फांद्या, भाजीपाला आणाल. मग शेतकरी उपाशी मरेल, ते निघून जातील. मग ते म्हणतील की, तुम्ही तर मोगलापेक्षा अधिक जुलमी आहात. शेतकऱ्यांचा तळतळाट लागेल. त्यामुळे शेतकऱ्यांस काडीचा देखील त्रास देऊ नका. तुम्हाला गवत, धान्य, भाजीपाला, लाकूड हवे असेल, तर बाजारातून योग्य मोबदला देऊन विकत आणावा. कोणावर जुलूम, अत्याचार अथवा भांडण करून घेऊ नका." काटकसरीने वागा, अत्याचार करू नका, शेतकऱ्यांना त्रास देऊ नका, अशा सक्त सूचना शिवाजी महाराजांनी अधिकाऱ्यांना दिल्या होत्या.

'रयत (शेतकरी) सुखी तर राजा सुखी' हे शिवाजी महाराजांच्या राज्यकारभाराचे मुख्य सूत्र होते. स्वराज्यामध्ये जनावरे, गवत, शेतीमाल, शेतकरी याबाबत शिवाजी महाराज किती दक्ष असत, हे त्यांनी अधिकाऱ्यांना दिलेल्या सूचनांवरून स्पष्ट होते.

1. ज्याच्याकडे शेत कसण्याची कूवत आहे, मनुष्यबळ आहे पण मशागतीस बैलजोडी नाही, बी-बियाणे नाहीत त्याला दोनचार बैल घेण्यास रोख रक्कम द्यावी किंवा सरकारातून बैल आणि बी- बियाणे द्यावेत.
2. शेतकऱ्यांस सरकारातून दिलेले कर्ज वाढीव पद्धतीने वसूल न करता त्याच्या शेतीचे उत्पन्न तयार झाल्यावर त्याच्या कुवतीनुसार हप्त्याने वसुल करावे. गावचा गाव फिरून तेथील शेतकरी जेवढे आहेत ते गोळा करावे, कोणाकडे मनुष्यबळ आहे, बैल आहे, यांची कोणाकडे कशी व्यवस्था आहे याची विचारपूस करावी.
3. दुष्काळ प्रसंगी शेतकऱ्यांना त्यांच्या कुटुंबाच्या भरण पोषणासाठी दोनचार खंडी धान्य द्यावे. त्याच्याने शेत करवेल ते करवून घ्यावे, नंतर बैलाचे व धान्याची रोकड वाढीदिडी न करता फक्त मुद्दलच हळूहळू त्याच्या ऐपतीप्रमाणं वसून करावी.
4. नवीन शेतकऱ्यांस सोई-सवलती देऊन पडिक जमीन लागवडीखाली आणावी, त्यासाठी सरकारने रक्कम मंजूर करावी.
5. ज्या शेतकऱ्यांवर सरकारची मागील बाकी येणे आहे पण त्याच्याजवळ काहीच नाही. अशा शेतकऱ्यास जर तो शेती करण्याची अजूनही उमेद धरत असेल तर त्यास सर्व प्रकारची मदत करावी. त्याच्यावरील कर्ज माफ करण्यासारखे असेल तर तसे कळवावे.
6. दिव्यातील ज्योत विझल्याशिवाय झोपी जावू नकोस, अन्यथा उंदिर दिव्यातील पेटती ज्योत पळवतील. कडब्याच्या गंजी पेट घेतील. गुराढोरांना चारा मिळणार नाही. गुरे-ढोरे दूध देणार नाहीत. माझ्या रयतेची बालके दुधापासून वंचित राहतील.
7. शेतकऱ्यांना लुटू नये, शेतकऱ्यांच्या मालाची चोरी करू नये, शेतकऱ्यांची इमानेइतबारे सेवा करावी. शेतकऱ्यांच्या भाजीच्या देठास देखील मन दाखवू नये. शेतकऱ्यांच्या काडीस देखील हात लावू नये. जर तुम्ही तसे कराल, तर मी तुमच्यावर राजी नाही असे समजावे.
8. जिन्नसच वसूल घेऊन जमा करीत जाणे आणि मग वेळच्या वेळी विकत जाणे. महाग विकेल आणि फायदा होईल ते करीत जाणे. वसूल हंगामशीर घ्यावा आणि साठवण करून विक्री अशी करावी, की कोणत्या वेळेस कोणता जिन्नस विकायचा, माल तर पडून राहता कामा नये आणि विक्री महाग झाली पाहिजे. दहा बाजार केले तरी चालतील, पण मालाला भाव मिळाला पाहिजे. ज्याने शेतकऱ्यांचा फायदा होईल.
9. शिवाजी महाराजांनी शेतकऱ्यांच्या हितासाठी लिहिलेल्या आज्ञापत्रात म्हणतात, “तुमची पाटीलकी ही रयतेच्या हितासाठी सोपवलेली जबाबदारी आहे, तुम्ही पाटील असून रयतेचे मालक नाहीत. म्हणून तुमच्याकडे काहीही शिल्लक राहिले नाही तरी चालेल, परंतु माझ्या स्वराज्यात कोणीही उपाशी राहता कामा नये. कोणत्याही शेतकऱ्यांला अडवू नये, त्यांना कर्ज द्यावे, स्वराज्यात नव्याने दाखल झालेल्या शेतकऱ्यांना नांगर, बी-बियाणे, आर्थिक मदत करा” अशा प्रकारचे आदेश पाटलाला केले.

यामधून शिवाजी महाराजांची रयतेप्रतीची, शेतकऱ्याप्रतीची निष्ठा दिसून येते. म्हणून शेतकऱ्यांची मुल शिवाजी महाराजांच्या सैन्यामध्ये गेली. “आपण मेलो तरी चालेल, पण आपला हा लाखाचा पोशिंदा राजा जगला पाहिजे” अशी भावना या शेतकऱ्यांची, कष्टकऱ्यांची बनली. म्हणून शिवा न्हावी, बाजीप्रभू, तानाजी मालुसरे यांच्यासारखे सैनिक तयार झाले.” यावरून शिवकालीन कृषी व्यवस्थेमध्ये आणि शिवपूर्वकालीन कृषी व्यवस्थेमध्ये झालेले बदल दिसून येतात.

**सारांश -**

शिवपूर्वकालीन स्वराज्यातील कृषी व्यवस्था ही अतिशय रसातळाला गेलेली होती. या कृषी व्यवस्थेमध्ये शिवाजी महाराजांनी जे सकारात्मक बदल केले ते विशेष उल्लेखनीय आहेत. वर्तमान काळात देखील त्या पथदर्शक आहेत. शिवाजी महाराजांच्या स्वराज्याचा केंद्रबिंदू असलेल्या शेतकऱ्यामुळेच त्यांची कुळवाडीभूषण आणि बहुजन प्रतिपालक ही प्रतिमा निर्माण झाली. त्याविषयी कॉ. गोविंद पानसरे म्हणतात की, "छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याचा केंद्रबिंदू बहुजन समाज व शेतकरी समाज हा होता. म्हणून ते कुळवाडीभूषण होते." त्यांनी सरदारांच्या लुटीला विरोध केला. त्यांनी एका आज्ञापत्रात लिहिले आहे की, "तुम्हाला शेतकऱ्यांकडून अतिरिक्त कर वसूल करता येणार नाही, पिकलं नाही तर शेतसारा वसूल करता येणार नाही, दुष्काळ पडला तर शेतसारा माफ करावा लागेल, उत्पन्न पाहून शेतसारा लावावा लागेल." अशा स्वरूपाच्या वतनदारांच्या आर्थिक जाचाला प्रतिबंध घालून शिवाजी महाराजांनी लोक कल्याणकारी व्यवस्था निर्माण केली. म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांना 'कुळवाडीभूषण' असे संबोधले. स्वराज्यात अन्नधान्याची टंचाई होऊ नये. रयतेची उपासमार होऊ नये म्हणून शिवाजी महाराजांनी स्वराज्यात कृषीविषयक नवीन कायदे करून शेतीमध्ये आमुलाग्र परिवर्तन केले. सर्वसामान्य माणसांच्या दृष्टीने उचलले गेलेले हे महत्वाचे पाऊल होय. जनतेला शेती करण्यास शिवछत्रपतींनी प्रोत्साहन दिले. नव्याने जमिन करणाऱ्यांना बी - बियाणे देऊन औत - फाट्यास मदत केली. नवीन लागवडीस आलेल्या जमिनींना 4-5 वर्षे महसूल सुध्दा कमी केला. दुष्काळासारख्या संकटात शेतकऱ्यांना महसूल माफ करून सढळ हाताने मदत केली. येवढे करून ते थांबले नाही, तर सैनिकांना शेतकऱ्यांच्या पिकांचेही संरक्षण होईल असे वर्तन करण्याच्या आज्ञा दिल्या.

**निष्कर्ष -**

1. शिवपूर्वकाळात स्वराज्यात असलेल्या राज्यकर्त्यांनी महसूल वाढण्यासाठी, आपल्या राज्याची आर्थिक भरभराट व्हावी या उद्देशाने शेतीमध्ये सुधारणा केल्या, सिंचनाच्या सोयी निर्माण केल्या, परंतु यामध्ये शेतकरी हिताचा कोठेही विचार नव्हता.
2. शेतीच्या वाढीव उत्पन्नाचा शेतकरी वर्गाला फायदा न होता राज्याला आणि संबधित अधिकाऱ्यांना त्याचा फायदा होत. अस्मानी सुलतानी संकटापासून शेतकऱ्यांना सरक्षण नव्हते.
3. शिवपूर्वकाळात स्वराज्यातील शेती आणि शेतकऱ्यांना कुठल्याही प्रकारचे सरक्षण, सवलती नव्हत्या. राजाकडून अथवा राज्याच्या सैन्याकडून शेतकरी वर्गाच्या शेतीच्या होणाऱ्या नुकसानाबद्दल शेतकरी आपल्या नशिबाला दोष देत. परंतु शिवकाळ सुरू झाल्यावर शेतीच्या पिकाला आणि शेतकऱ्यांच्या संरक्षण दिले जाऊ लागले शेतकरी हिताचा विचार होऊ लागला.
4. शिवकाळात अनेकदा दुष्काळ पडल्याने जल दुर्भिक्ष्य निर्माण झाले, सिंचनाचे प्रमाण देखील कमी होते शिवाय उद्योग-व्यवसाय सुद्धा मर्यादित होते. आजच्या सारख्या कुठल्याही अद्ययावत सोयी सुविधा उपलब्ध नव्हत्या. तरीदेखील शेतकऱ्यांनी शेती सोडून पलायन केले नाही अथवा आत्महत्या केल्या नाहीत. याला कारण शिवाजी महाराजांचे शेती आणि शेतकरीविषयक धोरण आहे.
5. शिवाजी महाराजांनी तत्कालीन काळात शेतीला उद्योगाचा दर्जा दिला. कुठलाही उद्योग उभा करतांना मूलभूत सुविधा असणे अत्यंत आवश्यक असल्याने त्यांनी पायाभूत सुविधा उभारण्यास खूप महत्व दिले. विजेची सुविधा नसताना देखील वाऱ्याचा, अग्नीचा, धुराचा योग्य उपयोग करुन अनेक पायाभूत सुविधा उभारल्या.
6. स्वराज्यात अनेक ठिकाणी नद्या व कालवे अडवून धरणे बांधली, विहीरी बांधल्या, वाहतुकीसाठी घाटरस्ते बांधले, शेतीसाठी जमिनीचे सपाटीकरण करवले शेतीमधून रोजगार निर्मिती केली. गरजू लोकांना जमीन

कसायला दिली आणि खाजगी जमिनीचे सरकारीकरण केले. ह्या कॉन्सेप्टला आज आपण **'अंडरटेकिंग अँड पब्लिक कॉर्पोरेशन'** असे म्हणतो.

**संदर्भ ग्रंथ सूची -**

1. कुलकर्णी, गो.त्र्यं. - छत्रपती शिवाजी महाराजांचे शेती आणि जमीन महसूल यासंबंधीचे धोरण, महाराष्ट्र राज्य पाठ्युस्तक निर्मिती व अभ्यास मंडळ, पुणे, 1976.
2. देशमुख, विजय - महाराजांच्या मुलुखात, वैशाली प्रकाशन, नागपूर, पहिली आवृत्ती, ऑक्टोबर 1976.
3. राऊत, गणेश - छत्रपती शिवाजी महाराज आणि शिवकाळ, डायमंड पब्लिकेशन पुणे, प्रथम आवृत्ती 2013.
4. सहस्त्रबुद्धे, पु.ग. - महाराष्ट्र संस्कृती, काँटिनेंटल प्रकाशन, पुणे, तृतीय आवृत्ती, 2003.
5. सरदेसाई, बी.एन. - मराठ्यांचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, 2001.
6. सामंत, बाळ - शिवकल्याण राजा, निर्मिती प्रकाशन, मुंबई, 1998.